भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०१/२०१७

**१) मुलीचा विनय भंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/१२/२०१६ रोजी १८.३० वा. दर. यातील फिर्यादी ही सायकलने मामाच्या घरून तिच्या घरी साईबाबा राईस मिल सेंदुरवाफा समोरून रोडने घरी जात असतांना यातील आरोपीने त्याच्या स्कुटी गाडीने फिर्यादीचा पाठलाग करून तिला अश्लील शब्दात बोलुन विनय भंग केला व फिर्यादीस जिवेमारण्याची धमकी दिल्याने पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४ (ड) (१) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी फुकट पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २८/०४/२०१६ चे २२.३० वा. ते ऑगष्ट २०१६ पर्यत यातील आरोपीने अल्पवयीन फिर्यादी पिडीत मुलीस लग्नाचे आमीष दाखवुन तिचे संमतिने वारंवार शारीरीक संबध प्रस्थापीत करून पिडीत मुलगी ही ५ महीण्याची गरोदर झाली परंतु आरोपीने फिर्यादी पिडीत मुली सोबत लग्न करण्यास नकार दिला आहे यातील आरोपी अल्पवयीन फिर्यादी मुलीस गर्भधारना करण्यास कारनीभुत झाले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७६ (१)(२)(एन) भादवी.सहकलम ५ (ज),६ लैगीक अपराधापासुन बालकांकांचे संरक्षन अधी. २०१२ अन्वये गुन्हा पोलीस स्टेशन लाखांदुर येथे दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ३०/१२/२०१६ रोजी १७.०० वा. दर. यातील फिर्यादी सौरभ शंकर राहाटे वय २४ वर्ष रा. प्रगती कॉलोनी स्टेशन रोड भंडारा यांनी आपली हिरो कंपनीची सीडी डिलक्स काळया जाभंळया रंगाची मोटार सायकल क्र. एमएच ३६ सी ८४७० कि. २०,०००/–रू ची मदार पाणढेल्या समोर गांधी चौक भंडारा येथे उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ३१/१२/२०१६ चे १६.३० ते १७.३० वा. दर. यातील फिर्यादी विठोबा तुकाराम कावळे वय ५२ वर्ष रा. आंबोरा ता. चंद्रपुर हा चपराड पाहाडी देवीच्या मंदीरात जेवनाचे काम करण्याकरीता गेला असता त्याचे मालकीचे पहाडीच्या पायऱ्या जवळ ठेवलेली हिरो होन्डा स्पलेंन्डर प्लस मोटार सायकल क्र. एमएच ३४ एसी. २३९५ कि. २०,०००/–रू ची कोणीतरी अज्ञात चोराने कुनीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**५) एटीएम मशीनची तोडफोड करून त्यातील रकमेची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ३०+३१/१२/२०१६ चे रात्र दर. यातील अज्ञात आरोपीने बॅक ऑफ इंडीयाची एटीएम मशीन लावलेल्या ठिकाणी आत प्रवेश करून मशीनची तोडफोड करून त्यातील रकमेची चोरी करण्याचा प्रयत्न केल्याने फिर्यादी अजय ज्ञानेश्वर पोगडे वय २७ वर्ष रा. सावली ईपीएस कंपनीची एजंट मुबंई यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४५७,३८०,५११ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**६) विद्युत वितरण ऑफीस मधील ताब्यांच्या केबल वायर ची चोरी . :–**

दिनांक ३०/१२/२०१६ ते ३१/१२/२०१६ चे रात्र दर. यातील फिर्यादी महेश शालीकराम कोडवते वय २५ वर्ष रा. पेट्रोलपंप ठाणा हा आला विद्युत वितरणची ऑफीस बंद करून घरी गेला असता त्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने ऑफीस मधील स्पेअर रूमचा ताला तोडन आत प्रवेश करून कुनीही नसल्याची संधी साधुन २७५ मिटर तांब्याचा केबल वॉयर २८×२०५ स्पेअर एमएचा कि. २०,०००/–रू चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४६१,३८० भांदवि. अन्वये

७) अवैध दारू/ अडयांवर धाडी . :–

दिनांक ३१/१२/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. जवाहरनगर, व करडी येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ७३ लिटर हातभट्टी दारु कि. ३,६५०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.